# ॲग्रोमेट ॲडवायझरी बुलेटीन

## ग्रामीण कृ ष मौसम सेवा, ऐएमएफयु,

## कृषी हवामानशास्त्र वभाग

फोन : ०२०-२५५३८००९ कृषी महा वद्यालय, पुणे ४११ ००५ ई-मेल : amfupune@gmail.com

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला स मतीची साप्ताहिक बैठक दि. १५/०४/२०२५

## जिल्हा :पुणे

मागील आठवडयाचे हवामान :

मागील आठवडयाचे हवामान : पुणे परिसरात मागील आठवडयात कमाल तापमान ३७.७ ते ४१.३ अंश सेल्सिअस तर कमान तापमान १८.४ ते २५.३ अंश सेल्सिअसच्या दरम्यान होते. सकाळची सापेक्ष आर्द्रता ४९ ते ७४ टक्के तर दुपारची सापेक्ष आर्द्रता १२ ते २३ टक्के होती. वाऱ्याचा सरासरी वेग ताशी ३.८ ते ८.४ क.मी. होता.

हवामान अंदाज : पुढील पाच दिवसात पुणे जिल्ह्यात कमाल तापमान ३९ ते ४१ अंश सेल्सिअस, तर कमान तापमान १९ ते २१ अंश सेल्सिअसच्या दरम्यान राहील. सकाळची सापेक्ष आर्द्रता ५० ते ५९ टक्के तर दुपारची सापेक्ष आर्द्रता ३० ते ३८ टक्के दरम्यान राहील. वाऱ्याचा सरासरी वेग ताशी ०७ ते ११ क.मी. दरम्यान राहील. आकाश अंशतः ढगाळ राहील. वा-याची दिशा आग्नेयेकडून वायव्येकडे राहील.

| मागील आठवड्यातील हवामान (०९/०४/२०२५ ते १५/०४/२०२५) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (१५/०४/२०२५ ते १९/०४/२०२५) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **9** | **10** | **11** | **12** | **13** | **14** | **15** | दिनांक | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| 0.0 | 0.0 | 0.0 | 0.0 | 0.0 | 0.0 | 0.0 | पाऊस ( ममी) | 4 | 0 | 0 | 0 | 0 |
| 41.3 | 40.7 | 39.7 | 38.1 | 37.7 | 38.5 | 39.2 | कमाल तापमान(अं.से.) | 39 | 40 | 40 | 41 | 40 |
| 24.8 | 25.3 | 24.0 | 21.4 | 21.6 | 18.4 | 19.9 | कमान तापमान(अं.से.) | 21 | 20 | 19 | 19 | 20 |
| | | | | | | | ढग स्थिती (आकाश) | 2 | 2 | 2 | 1 | 1 |
| 69 | 73 | 65 | 61 | 74 | 58 | 49 | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | 50 | 55 | 56 | 59 | 59 |
| 20 | 19 | 16 | 23 | | 12 | | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | 38 | 36 | 36 | 35 | 30 |
| 4.9 | 6.0 | 8.4 | 7.1 | 7.2 | 3.8 | 4.1 | वाऱ्याचा वेग ( कमी/तास) | 7 | 10 | 10 | 11 | 10 |
| | | | | | | | वाऱ्याची दिशा (अंश) | 299 | 272 | 0 | 280 | 284 |

## हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | पीक अवस्था | कृ ष वषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश/ इशारा | | भारतीय हवामान खात्याच्या प्रादे शक हवामान केंद्र, मुंबई यांच्या अंदाजानुसार जिल्ह्यात दिनांक १५ ए प्रल, २०२५ रोजी तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता असून दिनांक १६ व १९ ए प्रल, २०२५ रोजी हवामान कोरडे राहण्याची शक्यता असून दिनांक १७ व १८ ए प्रल, २०२५ रोजी हवामान उष्ण व दमट राहण्याची शक्यता आहे. |
| वस्तारित श्रेणी अंदाज (ईआरएफएस) | | वस्तारित श्रेणी अंदाजानुसार (ईआरएफएस) मध्य महाराष्ट्र वभागात (धुळे, नंदुरबार, जळगाव, ना शक, अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर) दिनांक २० ते २६ ए प्रल, २०२५ दरम्यान<br>➢ पावसाचे प्रमाण सरासरी पेक्षा कमी राहण्याची शक्यता आहे.<br>➢ कमाल तापमान सरासरी इतके राहण्याची शक्यता आहे.<br>➢ कमान तापमान सरासरी इतके राहण्याची शक्यता आहे. |

| | | |
|---|---|---|
| सामान्य सल्ला | | • पावसाची शक्यता असल्याने काढणी केलेल्या शेतमालाची सुर क्षत ठिकाणी साठवणूक करावी, तसेच उघड्यावरील धान्य ताडपत्रीने झाकून ठेवावे.<br>• नवीन लागवड केलेल्या फळबागेमध्ये ज मनीत ओलावा टिकवून ठेवण्यासाठी आच्छादनांचा वापर करावा.<br>• शेतकरी बांधवांनी आपल्या पकाचे कीड व रोगासंदर्भात निय मत सर्वेक्षण करून , जर प्रादुर्भाव आ र्थक नुकसान पातळीच्या वर असल्यास, व वध योग्य त्या उपाययोजना कराव्यात.<br>• शेतकरी बंधूनी , हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला व हवामा नाचा पूर्वानुमाना करीता मेघदुत मोबाईल ॲपचा वापर करावा.<br>• शेतकरी बंधूनी, मेघगर्जना व वजेच्या पूर्वानुमानाकरिता दा मनी मोबाईल ॲपचा वापर करावा.<br>• शेतकरी बंधूनी, कृ ष वषयक माहितीसाठी, महात्मा फुले कृ ष वद्यापीठाच्या कृ षदर्शनीचा एक संदर्भ ग्रंथ म्हणून उपयोग करावा. |
| ऊस | पक वाढीची अवस्था | ऊस पकातील खोड कडीच्या जै वक नियंत्रणासाठी ट्रायकोग्रामा चलोनिस (ट्रायकोकार्ड) चार प्रती एकर तसेच कामगंध सापळे (इ.एस.बी.ल्यूर) ५ प्रती हेक्टरी वापरावेत. प्रादुर्भावग्रस्त झालेली रोपे ज मनीलगत कापावीत आ ण नष्ट करावीत. |
| कांदा | पक्वता ते काढणी अवस्था | पावसाची शक्यता असल्याने काढणी केलेल्या शेतमालाची सुर क्षत ठिकाणी साठवणूक करावी तसेच उघड्यावरील कांदा ताडपत्रीने झाकून ठेवावा. कांदा काढताना पातीसह काढून तो ३ ते ४ दिवस शेतामध्ये सुकू द्यावा. काढलेला कांदा ओळीमध्ये रचावा व अर्धवटरित्या पातीने झाकावा . पात वळल्यानंतर ४ से.मी. लांब मान ठेऊन पात कापावी. |
| उन्हाळी भुईमूग | शेंगा लागण अवस्था | भुईमूगाच्या शेंगा लागण्याच्या वेळी तसेच शेंगा पोसण्याच्या कालावधीत पाण्याचा ताण पडू देवू नये. पकास ज मनीच्या मगदुरानुसार व पकाच्या वाढीच्या अवस्थेनुसार पाण्याचे नियोजन करावे. |
| उन्हाळी बाजरी | पक वाढीची अवस्था | उन्हाळी बाजरी पकास ज मनीच्या मगदुरानुसार व पकाच्या वाढीच्या संवेदनक्षम अवस्थे नुसार पाण्याचे नियोजन करावे. |
| मका | काढणी ते साठवणूक अवस्था | अमेरिकन लष्करी अळीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी निंबोळी अर्क ५% कंवा इमामेक्टीन बेंझोएट ५ % एस.जी. ८ ग्रॅम प्रति लटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी. मात्र फवारणी केलेल्या मक्याचा वापर जनावरांच्या चा-यासाठी तसेच मका कणसांचा वापर खाण्यासाठी करु नये. पीक काढणी अवस्थेत आलेले असल्यास त्याची काढणी करावी. तसेच उन्हात चांगले वाळवावेत. साठवण कोंदट कवा ओलसर जागेत करू नये. |
| केळी | पीक वाढीची अवस्था | झाडे पडू नयेत म्हणून व वजनाने मोठ्या असलेल्या घडास गरजेप्रमाणे बांबूच्या कंवा पॉलीप्रोपेलीनच्या पाटट्यांच्या सह्यायाने झाडांना/घडाना आधार/टेकू द्यावा. केळीच्या घडाचे उन्हापासून संरक्षण करण्यासाठी केळीच्या वाळलेल्या पानांची पेंडी करून घड व घडाचा दांडा झाकावा. |
| आंबा | पक्वता ते काढणी अवस्था | अवेळी पाऊ साची शक्यता असल्याने फळ गळ कमी करण्यासाठी झाडांना आधार द्यावा. बागेत झाडांच्या आळ्यांमध्ये गवत, पालापाचोळा इ. अछ्यादनाचा वापर करावा. फळ पकण्याच्या अवस्थेत असताना फळमाशीची मादी फळांच्या सालीत अंडी घालते. त्यातून बाहेर येणा-या अळ्या गरावर उपजी वका करतात. कडीच्या नियंत्रणासाठी कीडग्रस्त फळे नष्ट करावीत. झाडाखाली जमीन नांगरावी. तसेच फळमाशीच्या नियंत्रणासाठी म थल युजेनॉल युक्त रक्षक सापळे बागेमध्ये एकरी ८-१० याप्रमाणे लावावेत. पक्व झालेल्या आंब्याची काढणी शक्यतो सकाळी दहापुर्वी कंवा दुपारी ४ नंतर करावी तसेच आंबा फळांची वाहतुक शक्यतो संध्याकाळी करावी. तयार झालेली आंब्याची फळे काढून सुर क्षत ठिकाणी पकण्यासाठी ठेवावे. |
| जनावरांचे व्यवस्थापन | | तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता असल्याने जनावरे सुरक्षीत ठिकाणी बांधावीत.<br>महात्मा फुले कृषी वद्यापीठाच्या देशी गाय संशोधन प्र शक्षण केंद्रांतर्गत पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र वभागाच्यावतीने वक सत करण्यात आलेल्या देशातल्या पहिल्या फुले अमृतकाळ ( **Phule** |

| | | |
|---|---|---|
| | | **Amrutkal App)** या पशुसल्ला मोबाईल प्रणालीचे (अॅप) लोकार्पण झाले असून , आता आपण ते मोबाईल मध्ये इंस्टाल करून मोबाईलवर पशुसल्ला घेऊ शकतो.<br>फुले अमृतकाळ अॅप डाउनलोड ( **Phule Amrutkal App Download)** केल्याने होणारे फायदे :<br>फुले अमृतकाळ या अॅप च्याद्वारे जनावरांना उष्णतेमुळे निर्माण होणारा ताण कमी करण्यासाठी , गोठ्यातील तापमान घट वण्याकरिता व योग्य आर्द्रता राखण्याकरिता सावलीची सोय करणे , योग्य वायु वजन राखणे , पण्याकरिता थंड पाणी उपलब्ध करून देणे , फॅन कंवा फॉगर यंत्रणा स्वयंचलीत पद्धतीने सुरू करणे तसेच संतु लत आहार नियोजन इत्यादी उपाय योजना करण्यासाठी वेळोवेळी सूचना दिल्या जातील. |

*टिप : शेतकरीबंधूनी पकावर कटकनाशकाची, बुरशीनाशकाची फवारणी करताना स्वत:ची योग्यती खबरदारी/ काळजी घ्यावी तसेच फवारणी करिता कसान कवच बॉडीसूटचा वापर करावा.

स्त्रोत :

१) हवामान पूर्वानुमान : प्रादे शक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

२) मागील हवामान : -

ठिकाण : कृ.म. व., पुणे.

दि. : १५.०४.२०२५

स्वाक्षरीत

प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, पुणे तथा

प्रमुख, कृ ष हवामानशास्त्र वभाग, कृ.म. व., पुणे